किंमत रु. १५/-

पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

• वर्ष १५ • अंक ८ • १६ डिसेंबर २०१५



पा ल क नी ती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

संपादक
संजीवनी कुलकर्णी

संपादक मंडळ
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

मुखपृष्ठ, अंक मांडणी व रेखाटने
वसीम मणेर

मुखपृष्ठावरील छायाचित्रे
www.snipview.com
www.trust.com

अक्षरजुळणी
स्वाती जामदार

जानेवारी ते डिसेंबर २०१६ साठी वर्गणी रु.२५०

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट 'पालकनीती परिवार' या नावाने काढावा.

संपर्क :
पालकनीती परिवार,
अमृता क्लिनिक,
संभाजी पूल कोपरा,
कर्वे रस्ता, पुणे-४११००४
फोन :(०२०)२५४४१२३०
palakneeti@gmail.com
www.palakneeti.org

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १५ वे अंक ८ वा
१६ डिसेंबर २०१५

लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.

या अंकात

- **भीती (कविता) –** प्रमोद तिवारी, अनुवाद – परेश जयश्री मनोहर
- **मुलांचा 'खेळ'... ढिश्क्याँव? –** आनंद पवार
- **मुलं आणि अध्ययनात येणाऱ्या अडचणी –** शारदा बर्वे
- **विचार करून पाहू – अवघड विषयांवरचा प्रांजळ संवाद** – नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर
- **आनंदाने शिकण्याच्या दिशेने**
- **शहाणी नसलेली वेबपाने –** प्रकाश अनभूले

अभिनंदन!

दर वर्षी 'लोकमत विमेन्स समिट' हा कार्यक्रम 'लोकमत' तर्फे आयोजित केला जातो. या वर्षी या समिटमध्ये विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांना 'सखी सन्मान पुरस्कारा'ने गौरवण्यात आले. पालकनीती परिवाराच्या शुभदा जोशी यांना त्यांच्या खेळघराच्या कामासाठी 'सामाजिक क्षेत्रातील योगदान' या विभागांतर्गत पुरस्कार देण्यात आला.

शुभदाताई पालकनीती परिवाराच्या विश्वस्त आहेत. त्या १९९४ पासून पालकनीती मासिकाच्या संपादन गटात काम करत आहेत आणि १९९६ पासून 'खेळघर' या झोपडवस्तीतील मुलांसमवेत शिक्षणाचे काम करणाऱ्या प्रकल्पाच्या समन्वयक म्हणून काम पाहात आहेत.

या सन्मानामुळे पालकनीतीचे काम अनेकांपर्यंत पोचले आहे याचा आनंद मनात आहे. खेळघराच्या पुढच्या वाटचालीसाठी खूप शुभेच्छा!

२०१५ या वर्षासाठी 'पालकनीती'चे अंक काढण्याची जबाबदारी आम्ही प्रगत शिक्षण संस्था व उगम गटातल्या साथींनी घेतली. त्यानिमित्ताने काही महत्त्वाचे वाटणारे पालकत्वासंबंधीचे मुद्दे वाचकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्नही केला. ग्रामीण भागातील न लिहिणाऱ्या काहीजणांना लिहिते करण्याची संधी या निमित्ताने आम्हाला मिळाली. आमचा गट 'कमला निंबकर बालभवन' या पूर्ण वेळ चालणाऱ्या शाळेशी संबंधित असल्यामुळे शिक्षणविषयक मुद्द्यांनाही स्पर्श करता आला.

'पालकनीती' मासिक चालवण्याच्या या समृद्ध करणाऱ्या अनुभवासाठी पालकनीती परिवाराचे आभार मानून आम्ही आपल्या सर्वांचा निरोप घेतो. २०१६ या वर्षासाठी पालकनीतीचे काम हाती घेतलेल्या 'क्रेस्ट' गटाला शुभेच्छा!

– प्रगत शिक्षण संस्था, फलटण व उगम गट, सावंतवाडी

संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफीक्स, सी-१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे-४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे-४११००४, येथे प्रकाशित केले.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

संवादकीय

माणसाची जात म्हणे विचार करणारी, त्यामुळे माणसानं शेतीचा शोध लावला, घरं बांधून आसरा निर्माण केला, आणि भाषा आणि कलांचा शोध लावून संवाद आणि आनंदाचंही वरदान जीवनाला मिळवून दिलं. निसर्गाच्या विविध आविष्कारांमागचं गूढ समजून घेण्याचाही प्रयत्न चालवला. आणि आपल्याला उमगलेलं हे जीवन आपल्या पुढच्या पिढ्यांनाही मिळावं म्हणून आपल्या पिल्लांना शिक्षण देण्याची कल्पनाही रुजवली. पण माणूस आपण जनावर आहोत हे काही विसरला नाही. आपला अधिकार आणि आपली टेरिटरी जपण्यासाठी त्यानं आपली विचारबुद्धी पणाला लावून तऱ्हातऱ्हांच्या शस्त्रांची निर्मिती केली, आणि ती अनन्वित हिंसाचारासाठी वापरण्यातच तो आता संपूर्ण मानवजातीच्या जीवनाची इतिकर्तव्यता मानू लागला आहे.

सीरिया, इराक, गाझा पट्टी, पॅलेस्टाइन, लिबिया, चेच्न्या, युक्रेन, अफगाणिस्तान, पाकिस्तान, इजिप्त, फ्रान्स अशी नावे घेत गेले तरी युद्धाची एक सलगता मानवतेवर लागून राहिलेली दिसते. 'लोकसत्ता'ने 'इस्लाम खतरे में है' असं शीर्षक देऊन इस्लामी दहशतीच्या छत्रीखाली ही युद्धं असल्याचं म्हटलं. प्रत्यक्षात कुठलीही युद्धं अशी सरळ साध्या सोप्या स्पष्टीकरणात मांडणं जरा भाबडेपणाचंच आहे. दुसऱ्या बाजूला आपली 'ब्रेकिंग न्यूज' वाली माध्यमं आपल्याला जेवता जेवता झेपतील एवढ्याच युद्धाच्या किंवा हिंसेच्या बातम्या देताना कुठेही आपणास ओकारी येणार नाही किंवा आपली रात्रीची झोप उडणार नाही याची काळजी घेतात. खरंच, काय आहे हो युद्ध? बॉम्ब पाडणाऱ्या विमानांचे व्हिडिओ? की भट्टीच्या कपड्यांत बंकरवर किंवा रणगाड्यावर बसलेला शिपाई? आणि अस्ताव्यस्त कपड्यातले ट्रकमधून हत्यारं वाहून नेणारे त्यांचे शत्रू? का पडलेली, भग्न, मानवाचा लवलेश नसलेली घरं? कुठेही या बातम्या आपल्याला खोलवर आत शिवत नाहीत... 'अरे बापरे कायकाय घडतं ना!' म्हणत आपण हात धुऊन गोडाचा घास घेतो.

युद्धाच्या परिस्थितीत जगणाऱ्या मुलांच्या डोळ्यादेखत आईवडिलांना मारले जाते, कदाचित त्याआधी आईवर बलात्कारही होतो. दोन तासांपूर्वी जी आई गाणं म्हणत असेल, बाबा अभ्यास घेत असतील, आता रक्तामांसाचा ढीग बनलेले असतात. काय वाटत असेल त्या मुलांना त्यावेळी? काय होत असेल त्यांच्या जीवनाचं– मनाचं– आयुष्याचं?

युद्धं, दंगली आणि कुठलाही हिंसक वाद मुलांवर दूरगामी परिणाम करतात. परिसरात घडणारी प्रत्येक गोष्ट मुलं टिपतात आणि पालकांनी सांगो अथवा न सांगो, त्याचा आपला आपला एक अर्थ लावत असतात. मुलांचं त्यांच्या आसपास घडणाऱ्या घटनांशी जुळवून घेण्याचं आपलं असं एक तंत्र असतं. कुठल्याही परिस्थितीशी ती जुळवून घेतातच. पण त्यांतून येणारं हताशपण, निराशा आणि नुकसान मनाशरीरावर वागवत राहतात.

आपल्याकडे युद्ध नाही म्हणून आपण नशीबवान आहोत असं कोणताही विचारी माणूस आज म्हणणारच नाही. आपल्याकडेही धोक्याची घंटा नक्कीच वाजलेली आहे. बदलती सामाजिक समीकरणं, वैश्विक राजकीय महत्वाकांक्षा, माध्यमांची तांत्रिक झेप आणि खुरटलेली वैचारिक वाढ या परिघामध्ये पालकत्व आणि मुलांचं संगोपन हा एक कळीचा मुद्दा आहे याची जाणीव दिसेनाशी होत असली तरी ती असणं आवश्यक आहे. पालक म्हणून आपली इथं भूमिका खूप महत्त्वाची ठरते.

आपल्या मुलांना बंदुका आणून न देणं, दुसऱ्या व्यक्तीच्या मनाशरीराला दुखावणं ही भली गोष्ट नाही हे त्यांना आपल्या वागणुकीतून दाखवणं इतक्या साध्यासुध्या वाटतील अशा गोष्टीही आपण आवर्जून करायला हव्यात. एका मित्राच्या मुलानंच आपल्या घरात टीव्ही नको, त्यानं घरातली शांतता भंग होईल असा हट्ट केला तेव्हा त्याचं किती कौतुक करावं असं मला वाटलं. ही उदाहरणं निश्चितच आशादायक आणि विश्वासक आहेत. कितीही कठीण वाटलं तरी मानवतावादी मूल्यांवर चालणं माणसाच्या जातीला अशक्य मुळीच नाही. पितृसत्ताक पद्धतीतून येणारा उन्माद आणि मालकीच्या अंगानं येणारी युद्धं यांना निश्चितच पर्याय आहेत, आणि माणसाच्या बुद्धिमत्तेला ते माहीतही आहेत.

बॉर्डरलेस वर्ल्ड फौंडेशनचे आदिक कदम म्हणतात, सीमारेषा या आपल्या अहंकाराचं प्रतीक आहेत. हे जग सीमामुक्त, आणि पर्यायानं युद्धमुक्त असूच शकतं. आपल्याला विचार करता येतो या गृहितकावर खराखुरा विश्वास मात्र पाहिजे.

• • •

भीती

विचित्र शब्द आहे भीती
निसरडा आणि चकवा
खूप घाबरायचो मी
साप, विंचू आणि पालीलाही
अजून आठवतं
पाल पकडायला धावणारा
तीन वर्षाचा लहान भाऊ
आणि खाटेवर चढून
थरथर कापत
माझं त्याला रागावणं
आता प्राण्यांची भीती नाही वाटत
पण
समजदार होणं
म्हणजे
भीतीचे नवे पडदे उघडणं असावं

आमच्या गावचा तगडा जवान रामा
ज्यानं
एका मोठ्या गुंडाला मरणाचं मारलेलं
काल
मरतुकडया सावकाराचे जोडे खात होता
त्याचा बाप म्हणाला,
आता अक्कल आली रामड्याला
आता काय भीती नाय

ही भीती बहुरूपी आहे
आधी घाबरवायचे
गोवर, कॅन्सर आणि प्लेग
आता
मरण्यावरही भारी बेरोजगारी
खूप भीती वाटते
'पाहिजेत' कॉलम वाचणाऱ्या
सेवानिवृत्त बापाच्या डोळ्यांची...

आज
काहीही घाबरवू शकतं तुम्हाला
कपाळावरचा टिळा
टोपी
दाढी

एवढंच नाही तर
साध्या एखाद्या रंगानंही
फुटू शकतो घाम...

खरं तर स्वप्नातही वाटलं नव्हतं
पण खरंय
मला भीती वाटते...
मला भीती वाटते
मुलीच्या सुंदर चेहऱ्याची...
आणि हो
तिच्या गोऱ्या रंगाचीही...

कोणीतरी म्हणालेलं
भीतीपासून वाचायचंय
तर
दुसऱ्याला घाबरव
पण
बघितला एक घाबरवणारा
ज्यानं गोळी घातली प्रेमिकेला
भीतीपोटी...

सांगताही येत नाही
पण
जेव्हा एकटा असतो
खूप घाबरतो
स्वत:लाच....
एक दिवस
आपलाच गळा दाबून बघितला
हेही बघितलं
की माझीच बोटं
माझे डोळे फोडू शकतात की नाही
आणि
त्या दिवशी
आपल्याच हातांवरून विश्वास उडाला माझा
श्वास माझ्याच विरुद्ध रचतात षडयंत्र
कितीही प्रयत्न केले
तरी
पाय अडखळतात दगडांना...

आता
मी कोणत्याही इमारतीच्या छतावर
किंवा पुलाच्या काठाजवळ जात नाही
माझ्या आत लपलेलं कोणीतरी
मला उडी मारायला सांगत असतं
तेव्हा मी जोरजोराने बडबडतो
किंवा
कोणालाही पकडून बोलत बसतो
काहीबाही...
पण
काय माहीत
एखाद्या दिवशी
सांगण्याऐवजी धक्काच दिला तर...

एक दिवस
मी स्वत:लाच
विचारलं,
घाबरतो कशाला नेमका ? ?
मार खाण्याला ?
भुकेला ? ?
मरणाला ? ?
कशाची वाटते भीती ? ? ? ?
काही काळ शांततेनंतर
एक खोलवर आवाज आला
मला भीती वाटते
भीतीची...

मूळ हिंदी कविता- **प्रमोद तिवारी**
मराठी अनुवाद- **परेश जयश्री मनोहर**
paresh.jm@gmail.com
9822914751

मुलांचा 'खेळ'... ढिशक्याँव?

- आनंद पवार

आनंद पवार 'सम्यक' या संस्थेचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत. पुरुषत्वाच्या पितृसत्ताक संकल्पना बदलून पुरुषांना माणूसपणाच्या वाटेने जाता यावे व स्त्रियांवर होणारा हिंसाचार थांबावा यासाठी ते स्त्री-वादी दृष्टिकोनातून काम करतात.

शाळांमध्ये मुलींच्या, मुलांच्या एखाद्या कार्यक्रमानंतर किंवा बक्षिस वितरणानंतर किंवा एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमानंतर टाळ्यांच्या कडकडाटात कौतुक होताना आपण अनेकदा अनुभवले असेल. टाळ्या वाजवणे हे कौतुकाची अभिव्यक्ती करण्याचे 'साधन' म्हणून आपणही वापरले असेल. आपण म्हणू की टाळ्यांचा आवाज त्या सगळ्या बालमनांना प्रोत्साहनाची थाप देतो. मुलांच्या आनंदात आपण सगळे सहभागी आहोत असे आपण टाळ्यांच्या माध्यमातून सांगतो. भारतीय संदर्भामध्ये टाळ्यांच्या आवाजाचे हे असे आगळेवेगळे महत्त्व आहे. खरे तर जगाच्या सर्वच कोपऱ्यांमध्ये टाळ्या वाजवणे हे कौतुक व्यक्त करण्याचे साधन मानले जाते. मात्र टाळीचा आवाज म्हणजे कौतुक ही संकल्पना जगभरातील सगळ्या मुलांसाठी एकसारखीच असेल असे नाही.

इलोट या माझ्या कांगो देशातील मित्राने मला वेगळीच कहाणी सांगितली, ज्यामुळे टाळ्या वाजवणे याबाबतच्या माझ्या समजुतीला धक्का बसला. त्याने सांगितले की डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगो या त्याच्या देशामध्ये शाळांमध्ये, घरात किंवा अगदी गावांमधल्या कार्यक्रमांमध्येही लोक टाळ्या वाजवत नाहीत. टाळ्यांच्या कौतुकाशिवाय कार्यक्रम ही कल्पना कदाचित आपल्याला रूचणारच नाही, म्हणून मी त्याला टाळ्या न वाजविण्याचे कारण विचारले. त्याने जे सांगितले ते माझ्या कल्पनेपलीकडचे होते. तो म्हणाला, ''टाळ्यांचा आवाज बंदुकीतून झाडलेल्या गोळ्यांसारखा येतो. अनेकजण जेव्हा एकत्र टाळ्या वाजवतात तेव्हा बंदुकीच्या गोळ्यांची बरसात होते तसा आवाज येतो आणि मुले कावरी-बावरी होतात, घाबरतात. म्हणून आम्ही टाळ्या न वाजवता दोन्ही हातांची बोटे आकाशाकडे करून तोंडाने संगीताचे आवाज काढतो आणि आमचा आनंद किंवा कौतुक साजरे करतो.''

आफ्रिकेमध्ये सामुदायिक जागांमध्ये आनंद व्यक्त करण्यासाठी वेगवेगळे समुदाय असे हात उंचावून तोंडातून आवाज काढतात आणि तो त्यांच्या संस्कृतीचा भाग आहे असे भाबडे विश्लेषण आपण करतो. त्याचा हिंसाचाराच्या मुद्द्याशी काही संबंध असेल अशी पुसटशीही कल्पना आपल्याला येत नाही. मात्र हीच आफ्रिकन मुलाबाळांची परिस्थिती आहे हे आपल्याला कुणी सांगतही नाही किंवा आपणही तसा विचार करत नाही. बंदुकीच्या सुटलेल्या गोळीसारखा आवाज येतो म्हणून टाळी वाजवायची नाही असा प्रघात त्यांच्या देशात असल्याचे कांगोप्रमाणेच युगांडा व झिंबाब्वेच्या माझ्या मित्र-मैत्रिणींनीही मला सांगितले आहे. ताल, नाद, वाद्य, सूर अशा विश्वात रमणाऱ्या आफ्रिकन समाजाच्या मूळ अभिव्यक्तीवरच हे आक्रमण आहे असे मला वाटते.

जगभरात विविध प्रकारच्या विषमता अस्तित्वात आहेत. कुठे वर्णावरून भेदाभेद तर कुठे जातीवरून. लिंग, आर्थिक परिस्थिती, शारीरिक क्षमता, शिक्षण या आधारांवरही भेदाभेद! या भेदाभेदीचे अस्तित्व इतके व्यापक की अनेकांना हा भेदाभेद नजरेसही पडत नाही. तो जणू जगण्याचा भागच झाला आहे. मुली-मुलांच्या जडणघडणीतच त्यांना असा भेदाभेद अंगवळणी पडतो. एका बाजूला अन्नाच्या अतिसेवनामुळे वजनवाढीची 'समस्या' असलेली अमेरिका, तर दुसऱ्या बाजूला हाडांना चामडे चिकटलेली सोमालिया किंवा विदर्भातील धारणी तालुक्यातील बालके. एका बाजूला प्रचंड सोयी-सुविधांच्या उपलब्धतेमध्ये जगणारी बालके, तर दुसरीकडे जगण्याच्या मूलभूत सोयी नसतानाही तग धरून राहिलेली अनेक मुली-मुले. एका बाजूला प्रचंड महागडे शिक्षण घेणारी बालके, तर दुसरीकडे शिक्षणाच्या कोरड्या गंगा. एकीकडे प्रचंड सुरक्षित वातावरणात सुखवस्तू स्थितीत जगणारी मुले, तर दुसरीकडे सतत बंदुकीच्या दहशतीखाली हिंसाचाराचे चटके सोसत जगणारी अक्षरशः करोडो बालके. युद्धाच्या छायेत आणि सशस्त्र संघर्षाच्या वातावरणात जगणाऱ्या बालकांची संख्या करोडोंमध्ये असल्याचे युनिसेफची आकडेवारी सांगते. आकाराने आणि पैशाने मोठ्या असलेल्या देशांनी शस्त्रास्त्रांच्या निर्मितीत मोठी गुंतवणूक केली. तयार होणारा शस्त्रसाठा, दारुगोळा, याला नियमित गिऱ्हाइकाच्या शोधात असणाऱ्या या बड्या देशांना जगात कुठे न कुठे सशस्त्र संघर्ष चालू राहाणे किंवा ठेवणे आवश्यकच असते. म्हणजे प्रौढांनी सुरू केलेल्या या सगळ्या युद्धांची, सशस्त्र संघर्षाची किंमत मात्र स्त्रिया, मुले आणि गरिबांना सोसावी लागते आहे.

आपण मागच्या दशकातील फक्त इराक युद्धाचे उदाहरण पाहिले तर त्याचे किती भयंकर परिणाम बालकांना सहन करावे लागले आणि अजूनही लागत आहेत याचा आपल्याला अंदाज यावा. युद्धामुळे इराकमधल्या ४.५ मिलियन, म्हणजे ४५ लाख बालकांना आपल्या दोनपैकी एका पालकाला मुकावे लागले असे इराक सरकारची सन २००७ ची आकडेवारी सांगते. हीच आकडेवारी पुढे असेही सांगते की सहा लाख मुले युद्धामुळे आता रस्त्यावर राहात आहेत. त्यांचे शिक्षण अर्थातच बंद झाले, गुन्हेगारी प्रवृत्तींनी त्यांना जाळ्यात ओढले, त्यांचे प्रचंड लैंगिक शोषण झाले आणि आजही सुरू आहे.

रस्त्यावर जगता येत नाही म्हणून मग बालकामगारीत कमालीची वाढ होऊन तब्बल १५ टक्के बालके त्यात ओढली गेली. सात लाख बालके शाळेत दाखलच झाली नाहीत. युद्धकाळात आणि त्यानंतर मूलभूत सोयी-सुविधांचा बोऱ्या वाजतो. मुळातच कमी असलेल्या पाणी, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य या सेवा व सुविधा मोडकळीस येतात. आज इराकमध्ये २५ लाख मुलांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही तर ३५ लाख मुलांसाठी सार्वजनिक स्वच्छतेच्या सुविधा नाहीत. इराक सरकारचीच आकडेवारी सांगते की २००३ पासून २००७ पर्यंत ४० लाख इराकी नागरिक विस्थापित झाले आणि त्यातील निम्मे म्हणजे २० लाख ही बालके होती! विस्थापनातील दाहकता ज्यांनी अनुभवलेली किंवा पाहिलेली नाही त्यांना विस्थापितांच्या अनेक समस्यांची ओळख कदाचित असणार नाही. विस्थापित छावण्यांमधली अनागोंदी, गैरसोयी, मूलभूत सेवा-सुविधांचा अभाव, अन्नाचा तुटवडा तर आरोग्याची प्रचंड हेळसांड आणि त्या जोडीला शासकीय किंवा बिगर शासकीय मदतकर्त्यांकडूनही होणारे हरतऱ्हेचे शोषण अशा वातावरणात विस्थापित राहातात. अर्थातच त्यांतही दुर्बल व सत्ताहीन असणाऱ्या बालकांना व स्त्रियांना याची जास्त झळ बसते. युनिसेफच्या मार्च २०१५ च्या एका अहवालातील आकडेवारी सांगते की आत्ता सुरू असलेल्या इराक-सिरियातील सशस्त्र संघर्षामुळे तब्बल १४ मिलियन म्हणजे १ कोटी ४० लाख बालके प्रभावित आहेत. ही भयावह आकडेवारी केवळ इराक आणि सिरिया इथली आहे. जगभरातील सशस्त्र संघर्षांचा आवाका पाहाता युद्धे किंवा सशस्त्र संघर्षांमुळे किती मोठ्या प्रमाणावर बालके प्रभावित होतात हे आपल्या लक्षात येईल.

युद्ध आणि सशस्त्र संघर्षात मुले केवळ बंदुकीच्या पुढेच असतात असे नाही तर अनेकदा त्यांना बंदुकीच्या मागेदेखील उभे केले जाते. जगभरात आज तीसच्या आसपास सक्रीय सशस्त्र संघर्षाच्या घटना सुरू आहेत आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचा अंदाज आहे की या सर्व संघर्षांमध्ये मिळून जगभरात अडीच लाख 'बाल-सैनिक' भरती आहेत. यातली बहुतेक सगळी भरती केले गेलेली असली तरीही काही अंशी बालके स्वतःहून या संघर्षांचा भाग झालेली दिसतात. पैशाचे आमिष, कुटुंबाच्या पालनपोषणाच्या जबाबदारीची खात्री देऊन मुलांच्या हातात शस्त्रे दिली जातात, तर काही वेळा मुलांचे अपहरण करून त्यांना सैन्यात भरती केले जाते. त्यांना भरती करणाऱ्यांमध्ये बहुतांशी बंडखोर सशस्त्र दलांचा समावेश असतो मात्र काही वेळा देशांच्या सशस्त्र दलांचाही सहभाग असतो. एका अंदाजानुसार सरकारी अथवा गैर-सरकारी सशस्त्र दलांमध्ये असलेल्या १८ वयाखालील एकूण बालकांपैकी ४०% मुली आहेत आणि लढणाऱ्या सैनिकांकडून 'न लढणाऱ्या सैनिक' म्हणून त्यांच्यावर लैंगिक गुलामी लादली जाते. सशस्त्र दलांच्या सगळ्या मुलग्यांच्या हातात बंदूक असते असेही नाही. त्यातील अनेकांचा वापर हमाल, स्वयंपाकी, सेवक किंवा हेर म्हणून केला जातो. गावाच्या सुरक्षिततेच्या बदल्यात काही ठरावीक संख्येत मुलांची मागणी करणाऱ्या सशस्त्र दलांच्याही काही घटना आहेत. सशस्त्र संघर्षात सहभागी झालेल्या या बालकांचे उर्वरित आयुष्य काय असेल याची आपण फक्त कल्पनाच करू शकतो. कुठल्याही सशस्त्र संघर्षामध्ये बंदुकीच्या पुढे काय किंवा मागे काय, दोन्हीही परिस्थितींमध्ये मुलांना अनेक परिणामांना सामोरे जावे लागते.

सशस्त्र संघर्ष केवळ मध्य-पूर्वेच्या देशांमध्ये किंवा आफ्रिकेमध्येच होतो असा आपला अनेकांचा समज असतो. विशेषतः महाराष्ट्राच्या सुखवस्तू विभागांमध्ये 'आपल्या देशात असे होत नाही' हा समज सार्वत्रिक असल्याचे आढळते. म्हणूनच युद्ध, संघर्ष असा विषय निघाला की मध्य-पूर्वेची किंवा आफ्रिकेची चर्चा जास्त होते आणि त्यामध्ये भारताच्या अशांत भागांत, जिथे सशस्त्र संघर्षाची स्थिती आहे, तिथे काय चालू आहे हे चर्चेत येत नाही. जम्मू-काश्मीर, उत्तर-पूर्वेकडील राज्ये व नक्षलवादी पट्ट्यातील सशस्त्र संघर्षाचा, दहशतवादाचा आणि सशस्त्र दलांच्या 'कारवाईचा' बालकांवर काय परिणाम होतो याबद्दल चर्चा होताना दिसत नाही. सन १९७९ ते २०१२ या कालावधीत एकट्या मणिपूर राज्यामध्ये फौजांनी केलेल्या 'एक्स्ट्रा-ज्युडिशियल' कारवाईमध्ये तब्बल १५२८ नागरिकांचा जीव गेला. त्यामध्ये ९८ बालके होती अशी माहिती न्यायालयीन-बाह्य कारवाईत बळी गेलेल्या व्यक्तींच्या कुटुंबांच्या संघटनेने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. मुळातच दुर्लक्षित असलेल्या आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड अरुणाचल प्रदेश आणि मिझोरममध्ये असंतोषाची भावना आहेच. त्यातच प्रचंड बेरोजगारीमुळे अतिशय लहान वयापासूनच बालकांमध्येही व्यसनाधीनतेचे प्रमाण जास्त आहे. पुढे त्यांची नैराश्य आणि सशस्त्र संघर्षाकडे ओढले जाण्याची शक्यताही बरीच आहे. मणिपुरात काम करणारी माझी एक सहकारी समशॉट कुल्हर असे म्हणते की निराश असलेले, अस्वस्थ असलेले आम्ही लोक अहिंसक मार्गाने संघर्ष करण्याचा प्रयत्न करतोच, पण मग आम्हाला लाठीमार सहन करावा लागतो. मग दरवेळी निषेधाचा मार्ग अहिंसक राहतोच असे नाही. बरीच किशोरवयीन मुले आता हातात दगड घेतात. अशा वेळी फौजांकडे मात्र बंदुकीच्या खऱ्या गोळ्या असतात.

(पान १० वर)

मुलं आणि अध्ययनात येणाऱ्या अडचणी

- शारदा बर्वे

शारदा बर्वे तीन दशकांहून अधिक काळ मानसशास्त्रज्ञ म्हणून पुण्यात काम करीत आहेत. अर्भकांपासून युवकांपर्यंत मानसशास्त्रीय तपासण्या, समुपदेशन याबरोबरच पुण्यातील काही शाळांमधील शिक्षकांशी नियमित संवाद हे त्यांच्या कामाचे स्वरूप आहे. स्वत:च्या 'अंतरंग' या बालक-पालक मार्गदर्शन केंद्राचे कामही त्या पाहातात.

अध्ययन-अक्षमतेविषयी अधिकाधिक माहिती करून घेण्याची वेळ आता खरोखरच आलेली आहे. जगामध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषांचं लिपीत रूपांतर झाल्यापासूनच वाचन आणि लेखन जमत नसण्याच्या अडचणी मुलांना आणि मोठ्यांनाही येतच असणार. गेल्या काही वर्षांमध्ये अशा प्रकारच्या अडचणींची कारणं शोधून काढण्याचा प्रयत्न बऱ्याच मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे आणि त्यावरच्या संशोधनातून पुष्कळ समाधानकारक उत्तरं सापडू लागली आहेत. मानवी मेंदू आणि मज्जासंस्था यांविषयीच्या संशोधनातल्या प्रगतीमुळे हे शक्य झालं आहे.

अध्ययन म्हणजे शिकणं. ते तर आपण गर्भावस्थेत असल्यापासूनच करत असतो म्हणजे खरं तर ते आपोआप होत असतं. शिकण्यासाठी आवश्यक असणारे पंचेद्रियांचे मार्ग आपल्याला उपलब्ध असतात आणि त्यांमार्गे मिळालेल्या माहितीचा अर्थ लावण्यासाठी अत्यंत कार्यक्षम असा मेंदूही. मात्र नकळत शिकत जाणं आणि समजून घेण्यासाठी जाणीवपूर्वक काहीही शिकणं यात पुष्कळ फरक असतो. जाणीवपूर्वक शिकणं अधिक अर्थपूर्ण असतं. **अध्ययनात येणाऱ्या अडचणी असं किंवा अध्ययन-अक्षमता असं म्हटलं जातं तेव्हा ते लौकिकार्थानं ज्याला शिक्षण म्हणतात त्या संदर्भात असतं. नकळत शिकल्या जाणाऱ्या गोष्टींबाबत अक्षमतेचा विचार केला जाऊ नये कारण या गोष्टींचा अध्ययनाशी म्हटलं तर थेट परंतु बऱ्याचदा अप्रत्यक्षपणे संबंध असतो.**

काही ना काही शिकण्याची क्षमता प्रत्येकात असतेच; मग अशा क्षमतांचं प्रमाण निरनिराळं असणार हेही गृहीतच असायला हवं. म्हणूनच शिकण्यातली अडचण किंवा अक्षमता असणं हे लेखनाच्या, वाचनाच्या आणि गणिताच्या बाबतीतल्या शिक्षणाच्या किंवा त्यासंदर्भातच घडणाऱ्या इतर गोष्टींबाबत होतं हे मानलं जायला हवं. नाहीतर प्रत्येक व्यक्तीतली कुठल्या ना कुठल्या बाबतीतली अक्षमता आपल्याला सतत दिसत राहिली असती. अध्ययनाच्या किंवा शिक्षणाच्या संदर्भात गरजेच्या असणाऱ्या क्षमतांचा विचार करणं आणि त्यांची सार्वत्रिकता लक्षात घेऊन त्यांची कारणं जाणून घेणं आणि त्यावर करता येणाऱ्या उपायांचा विचार करणं ही महत्त्वाची बाब ठरली आहे.

अध्ययन-अक्षमता आहे हे कसं ओळखायचं?

कुठल्याही मुलामध्ये अध्ययन-अक्षमता असू शकते. **परंतु अध्ययनातल्या अडचणी दिसून येऊ लागल्या तरी अक्षमतेचं निदान कधी करायचं याचाही काही विचार नक्कीच असायला हवा.**

अध्ययन-अक्षमता पुष्कळदा अनुवंशिक असते. अनुवंशाने स्वभाव, हावभाव, बुध्दिमत्ता, डोळ्यांचा रंग इत्यादी गुण पुढच्या पिढीत उतरू शकतात त्याचप्रमाणे कितीतरी कौशल्यंही पिढ्यान्पिढ्या उतरत आलेली आपण पाहतो. अक्षमतेचंही तसंच आहे. मात्र आईवडिलांपैकी एकामध्ये काही प्रकारची अक्षमता असेल तर ती मुलांमध्ये उतरलीच पाहिजे असा काही नियम नसला तरी तशी शक्यता मात्र अधिक असते. आईवडिलांमध्ये असणाऱ्या लेखन-वाचन किंवा गणिताच्या अडचणी पुढच्या पिढीमध्ये संक्रमित होतीलच अशी भीती बाळगण्याचं मात्र काहीच कारण नसतं कारण मुळात **अध्ययन-अक्षमता असणं किंवा शिकण्यात अडचणी असणं ही भीती बाळगण्यासारखी गोष्टच नव्हे.**

भीती बाळगण्यासारखी गोष्टच नव्हे असं जेव्हा मी म्हणते तेव्हा त्याला, **अक्षमतेच्या जोडीला गृहीत असणाऱ्या किंवा आपण गृहीत धरू शकू अशा, बुध्दिमत्तेच्या पातळीचा आधार आहे.** शिकण्यात विशिष्ट अडचणी येतात तेव्हा सर्वप्रथम मुलाच्या बुध्दिमत्तेची पातळी कमीतकमी सर्वसाधारण कक्षेत बसण्याइतकी किंवा त्यावरची आहे ना याची खात्री करून घेतली जाते. म्हणजेच मुलांची बुध्दिमत्ता - मग ती सर्वसाधारण किंवा त्यापेक्षा कितीही वरची असो- आणि त्यांना येणाऱ्या अडचणी परस्परावलंबी नसतात हे लक्षात घ्यायला हवं. **म्हणजेच अडचणींचं प्रमाण बुध्दिमत्तेच्या पातळीप्रमाणे बदलतं असं होत नाही तर त्या एका प्रकारच्या किंवा मिश्रही असू शकतात.**

सर्वसाधारण किंवा त्यापेक्षा वरच्या पातळीची बुध्दिमत्ता असणाऱ्या मुलांनी किंवा व्यक्तींनी त्या त्या वयानुसार अपेक्षित असणाऱ्या गोष्टी शिकत जाव्यात, आत्मसात करत जाव्यात अशी आपली अपेक्षा असते किंवा पालक तसं गृहीत धरतात. मग वाचायला शिकण्यात, लिहायला लागण्यात किंवा साधी गणितं करण्यात अडचणी येतात म्हणजे नक्की होतं काय किंवा कसं?

घरातले ताई-दादा किंवा मोठी माणसं काहीतरी लिहितात, ते एकमेकांना वाचून दाखवतात; पुस्तकं आणतात, ती वाचतात, क्वचित एखादं पत्रं येतं त्याला उत्तर लिहिलं जातं हे मुलं अगदी लहानपणापासून बघत असतात. त्यांच्यासाठी असणारी छोटी पुस्तकं म्हणा, रस्त्यातल्या दुकानांच्या पाट्या म्हणा या सगळ्यांमुळे त्यांना अक्षरं, नावं, शब्दांच्या ओळी सतत नजरेला पडत असतात. पुस्तकं डोळ्यांसमोर धरून काहीतरी वाचल्यासारखं करणं किंवा अक्षरांसारख्या दिसणाऱ्या रेषा काढून वहीची पानंच्या पानं भरून टाकणं यांसारख्या गोष्टी मुलं मन लावून करत बसलेली दिसतात. मनातलं लिहिल्यासारखं करून काय लिहिलंय ते वाचूनही दाखवतात.



जगातल्या कुठल्याही लिपीतली अक्षरं त्यांना जोडल्या गेलेल्या आवाजाचं प्रतिनिधित्व करतात. एखाद्या विशिष्ट आवाजाला त्याच अक्षराची जोड मिळाल्याचं पुन्हा पुन्हा दिसून येत राहिलं की मुलांना अक्षरांच्या रेषा, वळणं, त्यांचे जोड समजायला लागतात. त्यांच्या दृष्टीनं प्रथमत: ती रेखाचित्रंच असतात. समजून घेण्याच्या इच्छेनं अक्षरं शिकण्याची सुरूवात झाली तर ती त्यांना नक्कीच लवकर समजतात. यासाठी अर्थातच मेंदू तितका परिपक्व झालेला असावा लागतो. ही अक्षरचित्रं मेंदूला समजायला लागतात कारण त्यावेळी आपल्या मेंदूमध्ये काहीतरी रासायनिक प्रक्रिया घडते आणि पुन्हा पुन्हा सराव होत गेल्यावर ती पक्की होते. **अक्षम मुलांच्या बाबतीत कुठल्याही आकृत्या, अक्षरं, शब्द किंवा वाक्यंही जशी असतात तशी न दिसता वेगळी दिसू शकतात किंवा उलटीसुलटी दिसतात. यातही सातत्य रहात नसल्यामुळे पूर्वी शिकलेलं लक्षात राहून काही उपयोग होत नाही.**



शिकण्याची प्रक्रिया सर्वसाधारणपणे सगळ्यांच्या मेंदूमध्ये सारख्या प्रकारे घडून येते. फक्त उजव्या आणि डाव्या हातानं लिहिणाऱ्या किंवा इतर कामं करणाऱ्या मुलांच्या वा मोठ्या व्यक्तींच्या बाबतीत मेंदूमधल्या घडामोडींची जागा वेगवगळी असते. कुणाचा उजवा मेंदू प्रबल असणार आहे आणि कुणाचा डावा हे व्यक्तीव्यक्तीनुसार बदलतं. आपण एरवी सहज बोलताना 'त्याची ही बाजू उजवी ठरली', 'हा माणूस त्यांचा अगदी उजवा हात आहे' असं म्हणतो तसा भेद मेंदूच्या बाबतीत नसतो. म्हणूनच उजव्या किंवा डाव्या यापैकी कुठल्याही हातानं लिहिणं सारखंच मानलं गेलं पाहिजे. **कित्येक मुलांना त्यांचा डावखोरेपणा सोडून उजव्या हातानं लिहायला लावल्यामुळे वाचन-लेखनात अडचणी आलेल्या दिसून आलेल्या आहेत.**

आपल्याच मेंदूचे हे दोन्ही अत्यंत महत्त्वाचे असणारे भाग परस्परपूरकच असतात. त्याच्या अर्धगोलांच्या प्राबल्यामुळे त्या त्या व्यक्तीकडून होणाऱ्या क्रिया, कृती, हालचाली, विचार, बोलणं, भावनांची अभिव्यक्ती हे सर्व घडत असतं. वाचन, लेखन किंवा गणित करण्याच्या बाबतीत मुलांच्या मेंदूची आणि त्यातही मेंदूच्या माथ्यावरच्या भागाची जडणघडण कारणीभूत असते. **म्हणजे बुद्धिमत्ता वयानुरूप असूनही अपेक्षित प्रमाणात व्यक्त न होणं ही केवळ मुलाची जबाबदारी नसते तर त्याच्याशी संबंधित असणाऱ्या सगळ्यांचीच असते.**

काही लहान मुलांना इतर बहुतांश मुलांसारखं वाचायला-लिहायला जमत नाही आणि शिकायलाही वेळ जास्त लागतो. हे लक्षात आल्यावर 'तो वाचतच नाही; ती अगदी सावकाश लिहिते, कितीही मागे लागलं तरी लिहायलाच नाही म्हणते, एवढंच काय तर लिहिण्याचं टाळते म्हणून सगळ्या वह्या अपूर्ण राहतात; ह्याची वही अगदी चितारल्यासारखी दिसते; अक्षरं नसतातच' असं म्हणून **मुलालाच वाचन किंवा लेखन करायचंच नाहीये आणि म्हणून ही टाळाटाळ चालू आहे असं पालक व शिक्षक धरून चालतात.**

इथे सर्व पालकांनी अतिशय महत्त्वाची एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी ती अशी की निरोगी, वाढीच्या वयातला किंवा पूर्ण वाढ झालेला मानवी मेंदू काही ना काही शिकण्यासाठी सदैव तयारच असतो. वाचायला-लिहायला शिकण्यामध्ये किंवा गणित करण्याच्या एकूण प्रक्रियेमध्ये तांत्रिक भागही असतो हेही विसरता कामा नये. बोली भाषा मानवाकडे शेकडो वर्षांपूर्वीच आली असल्यामुळे ती आपण बरोबर घेऊनच जन्माला येतो पण त्यापुढची ही कौशल्यं शिकण्यासाठी स्थूल-कारक आणि सूक्ष्म-कारक विकास झालेला असणं, पोषक वातावरण असणं, योग्य प्रोत्साहन मिळणं यासारख्या बाबींचा समन्वय घडून यावा लागतो. **कारक-समन्वय योग्य होतो आहे की नाही आणि दृक्संवेदनाचा विकास वाचन-लेखनाच्या दृष्टीने कसा झालेला आहे हे तपासण्याच्या सोप्या चाचण्या मानसशास्त्रज्ञांकडे उपलब्ध असतात. त्या वापरून अडचण नक्की काय आहे हे शोधून काढता येतं,** उदा. दृक्कारकसंवेदनविकास साधारणत नऊ वर्षांपर्यंत जास्त प्रमाणात होतो असं दिसतं परंतु ज्या मुलाला अडचण असते त्याचं चाचणीवरचं विकासवय कमी येतं. हे अक्षमतेचं एक महत्त्वाचं कारण आणि निदर्शकही असू शकतं.

पुण्यातल्या एका बालकेंद्री शाळेतल्या एका मुलाची आठवण मला कारक समन्वयाच्या संदर्भात हमखास येते. बुद्धिमान असलेल्या पण शारीरिक मर्यादा असणाऱ्या या मुलानं लिहितं व्हावं म्हणून त्याच्या पालकांनी आणि शिक्षकांनी हर प्रकारचे प्रयत्न चालूच ठेवलेले होते. तरीही तिसरीच्या वयालाही छोट्या वहीचं एक पान लिहायला त्याला चार तास लागत. चांगली समज, मनापासून अभ्यास करण्याची इच्छा, पोषक वातावरण, आस्थेनं वाट बघण्याची सगळ्यांची तयारी असं सगळं असूनही या मुलाच्या लेखनाच्या वेगात फारसा फरक पडत नव्हता. याचं कारण एकच होतं. बोटात पेन्सिल धरण्याची क्रिया घडून आल्यावर ती पेन्सिल धरत राहून अक्षरं काढणं त्याच्यासाठी फार कष्ट 'कारक' होतं. त्याला होणारे हे मुळातले कष्ट कमी कसे करता येतील याचा विचार आम्ही सगळेच करत होतो. लिहिण्याचं समाधान त्याला मिळावं म्हणून एक सोपा प्रयत्न करायचं ठरलं. त्यावेळी कम्प्यूटरचा वापर तितका प्रचलित नव्हता त्यामुळे हातात असलेल्या साधनांपैकी ओल्या खळीचा वापर करून घेऊन काही मदत होते का ते पहायचं ठरलं. पांढऱ्या रंगाच्या ट्रेमध्ये रंगीत खळ पसरून दिली आणि हा छोटू त्याचे पेन्सिल धरण्याचे कष्ट वाचल्यामुळे फक्त बोटानं भराभर लिहू लागला. त्याची मदतनीस ताई त्यानं खळीत लिहिलेलं तसंच्या तसं वहीत उतरवून घेऊ लागली. **असा व्यक्तिविशिष्ट उपाय सापडल्यामुळे योग्य वेळी हवी तशी मदत या मुलाला मिळाली.**

बुद्धिमत्ता वयानुरूप असणं किंवा त्यापेक्षा वरची असणं आणि वाचता-लिहिता येण्यासारखं पर्यावरण असणं या, अक्षमता असणाऱ्या मुलांच्या बाबतीतल्या अत्यावश्यक गोष्टी आहेत. त्याचप्रमाणे मुलांचं चित्त एकाग्र होणं, शारीरिक चंचलता नसणं, मन स्वस्थ असणं याही आवश्यक बाबी आहेत. मुलं चंचल, थोडी अस्थिर असतातच. त्यांचं लक्षही चटकन विचलित होतं. हे सगळं वाचन-लेखनात प्रतिबिंबित होऊ लागलं की त्यावरच्या उपायांचा विचार करण्याची गरज निर्माण होते. **ज्या मुलांच्या मेंदूच्या विशिष्ट जडणघडणीमुळे ती चंचल किंवा अस्थिर असतात त्यांना केवळ वाचनात व लेखनात अडचणी येतात असं नाही तर जिथे जिथे कौशल्यपूर्ण एकाग्रतेची किंवा लक्षपूर्वक काहीतरी करण्याची गरज असते त्या त्या वेळी काहीतरी गोंधळ घडून येऊ शकतात. सलगपणे, क्रमवार, संगतवार कृती त्यांना करता येत नाहीत त्याचप्रमाणे त्यांना सलगपणे अक्षरं, कानेमात्रा, शब्द न गाळता, एवढंच काय तर शब्दांचे उच्चार वेगळेच केल्याशिवाय वाचता येत नाही. त्यामुळे वाचलेल्याचा अर्थ लावण्यामध्ये प्रश्न येऊ शकतात.** आजूबाजूला घडणाऱ्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीकडे - आवाजाकडे, लोकांकडे, मनात येणाऱ्या विचारांकडे कमी लक्ष जावं आणि ठरावीक ठिकाणी अवधान-केंद्रित करावं यासाठी मनातूनच गाळणी लावणं त्याना जमत नाही. म्हणून चंचल किंवा अस्थिर मुलांच्या बाबतीत नेमकं काय घडतं ते शोधून काढणं अतिशय महत्त्वाचं असतं. अंगी असणाऱ्या चंचलतेचा त्यांनाही फार त्रास होत असतो. त्यांचीही चिडचिड होते, अचानक प्रतिक्रिया येतात, हातून सांड-लवंड जास्त होते, वह्या-पुस्तकं हरवतात, ती नीट ठेवली जात नाहीत. या सगळ्या गोष्टींकडे आपण समजुतीनं आणि कनवाळूपणेच पाहायला शिकलं पाहिजे.

गणितात येणाऱ्या अडचणींचा विषय मनात आला की मला आणखी एका मुलाची हटकून आठवण येते. पुण्यातल्या एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणारा हा मुलगा त्यावेळी आठवीत होता. त्याची बुद्धिमत्ता सर्वसाधारण पातळीच्या वरची होती आणि मराठी, हिंदी आणि इंग्रजीमध्ये त्याची उत्तम प्रगती दिसत होती. भाषेचा अडसर नसल्यामुळे इतिहास, भूगोल आणि विज्ञानाचे पेपर लिहितानाही त्याला कुठलीच अडचण येत नसे. परंतु या सगळ्याला छेद म्हणून की काय त्याला गणितातल्या संकल्पनाच समजत नव्हत्या. मुळात बरी बुध्दिमत्ता असूनही विशेषत: गणितात गती येऊ शकत नाही हेच या मुलाच्या शाळेतल्या शिक्षकांना मान्यच होत नव्हतं. 'केवळ आळशीपणा आहे दुसरं काय ?' याखेरीज त्याविषयी त्यांना दुसरं मतही नव्हतं. मुलाच्या बुध्दिमत्ताचाचणीचा रिपोर्ट आणि गणित अक्षमतेचा पुरावा शाळेत दाखल केल्यावरही शाळेनं मुलाला काढून टाकण्याचा निर्णय घेतला आणि तो अमलातही आणला. **मुलाच्या स्वप्रतिमेला किती धक्का बसू शकतो याचा विचार किंवा मुलाला कशी मदत करता येईल याचा विचार कुठल्याही शाळेनं अशा वेळी करायला हवा.** गणित करता येत असेल तर तुम्ही 'चांगले', 'हुशार','नाहीतर तुमचं काही खरं नाही' अशीच भावना अशा घटनांमधून मुलांपर्यंत पोचते. त्यातूनच नकारात्मक विचार निर्माण होतात आणि एकूणच आत्मविश्वासाला धक्का बसू शकतो. **अशा वेळी सातवीचं गणित घेऊन दहावीच्या परीक्षेला बसता येतं.**

वाचन-अक्षमतेचाही परिणाम गणित विषयातली गती कमी होण्यावर झालेला दिसून येतो. लेखी उदाहरण वाचण्यात गल्लत झाली की पुढचं सगळंच गणित चुकू शकतं. तसंच, काही मुलांना गणितातली चिन्हं आणि अंक असतात त्यापेक्षा वेगळे, उलटे किंवा आरश्यातल्या प्रतिबिंबासारखे दिसू शकतात. यामुळेही उदाहरणं अपेक्षेपेक्षा वेगळीच केली जाण्याची शक्यता असते. चंचलता आणि वेंधळेपणा या गोष्टीही गणितं चुकण्यामध्ये भर घालणाऱ्या आहेत. **वाचन-अक्षमतेच्या बरोबरीनं लेखन-अक्षमता असणाऱ्या मुलांचं एकूण लेखनच अवाचनीय बनतं. कधी अंक उलटे लिहिले जातात तर कधी पुढचे आणि मागचे अंक किंवा संख्या लिहिण्यात गोंधळ होतो आणि अखेर गणित चुकतं.**

वाचन-लेखनातल्या असोत किंवा गणित करण्यातल्या असोत, ज्या चुका मुलांकडून होतात त्या बहुधा वयानुसार सुधारतात. घडणाऱ्या चुका मुलांच्याच लक्षात येतात आणि आपण होऊनच मुलं वाचण्यात, लिहिण्यात बदल करू लागतात.काहींच्या बाबतीत मात्र

ती मोठी झाल्यावरही त्याच प्रकारच्या त्रुटींसह वाचन किंवा लेखन होत राहतं, वाक्यरचना चुकत राहतात. कित्येक मुलांना आठवी-नववीच्या वयाला लेखनाची अडचण येत असेल तर गृहपाठाच्या वेळी सुद्धा मुलांनी तोंडी सांगायचं आणि पालकांनी किंवा मोठ्या भावंडानं लिहून काढायचं या पद्धतीनं पुष्कळ मदत होते.

परीक्षेच्या वेळी काय करावं ?

- वाचन-अक्षमता असलेल्या मुलाला प्रश्नपत्रिकेतले प्रश्न वाचून दाखवल्यास मदत होते.

- लेखन-अक्षमता असेल तर तोंडी परीक्षा घेऊन मुलांच्या आकलनाचा व्यवस्थित अंदाज घेता येतो.

- परीक्षेच्या वेळी मुलानं उत्तरं सांगायची आणि त्याला मदत करण्यासाठी लेखनिकानं ती तशीच्यातशी लिहायची अशी व्यवस्था करता येते.

- लेखी अभिव्यक्तीची अडचण असणाऱ्या मुलांना जास्तीतजास्त पर्याय देणारी प्रश्नपत्रिका देऊन त्यांचं मूल्यमापन करता येतं.

- आता तर चौथी पाचवीच्या वयालाही कम्प्यूटरचा काही प्रमाणात वापर करू दिला तरी हरकत नसते.

जगातल्या कितीतरी प्रसिध्द आणि नामवंत व्यक्तींनी अशा प्रकारच्या अडचणींना लहानपणी तोंड दिलं आहे हे आपल्याला माहीत आहे. एका यशस्वी व्यावसायिकाला प्रौढपणीही जाणवत



राहणाऱ्या अडचणीचा नमुना मुद्दाम वर दिला आहे -

मुलांचा यथायोग्य स्वीकार करून त्यांच्यासाठी सातत्यानं आणि योग्य दिशेनं प्रयत्न केल्यावर त्यांच्यामध्ये सकारात्मक फरक दिसून येतात आणि ती हवं ते शिक्षण घेऊन आत्मविश्वासानं समाजात वावरू शकतात याची खात्री बाळगावी.

शारदा बर्वे
sharada.barve@gmail.com
9822997795

'चिल्ड्रन अँड लर्निंग डिफिकल्टीज' या डॉ ओनिता नाक्रा यांच्या इंग्रजी पुस्तकाचे शारदा बर्वे यांनी केलेले मराठी रूपांतर - 'अध्ययन अक्षमता आणि मुले' हे ज्योत्स्ना प्रकाशनातर्फे लवकरच प्रकाशित होत आहे.

मुलांचा 'खेळ'... ढिश्क्याँव?

(पान ६ वरून)

कित्येक किशोरवयीन मुलांच्या पायावर गोळ्यांच्या खुणा सापडतील. तिच्या या म्हणण्याचा अर्थ मला असा लागतो की सशस्त्र संघर्षाचा परिणाम केवळ मृत्यूच असेल असे नाही तर इतर हानी, संधींची कमतरता, कुपोषण, अपंगत्व अशा अनेक परिणामांना बालकांना सामोरे जावे लागते. सैनिकीकरणाच्या वातावरणात बालकांना कुठल्या न कुठल्या स्वरूपाने धोका हा असतोच. शारीरिक नसला तरी तो भावनिक, मानसिक असू शकतो. दर ५० मीटर अंतरावर बंदुका घेतलेले सैनिक आणि त्यांच्या गाड्या, गणवेश, चौकशी व संशय याचा सर्वांवरच परिणाम होत असतो, आणि बालकांवर तर तो जास्तच होतो. या सैनिकीकरणामागचे राजकारण त्यांना कदाचित कळत नसेल परंतु त्यामुळे राग, भीती, निराशा, असुरक्षितता वाटत नसेल असे मात्र नाही.

काही वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये एका 'वस्तू'शी खेळताना त्या वस्तूचा स्फोट होऊन शब्बीर अहमद या मुलाला पाय गमवावा लागला. पुढे त्याला शाळाही सोडावी लागली. याच स्फोटात त्याचा नऊ वर्षाचा भाऊ व इतर दोन शाळकरी मुले मृत्यू पावली. मुलांचे म्हणणे आहे की गावाच्या वरच्या बाजूला सैनिकांची छावणी आहे आणि ही 'वस्तू', जिला मुलांनी फुटबॉलसारखे लाथाडण्याचा प्रयत्न केला, सैनिकांच्या छावणीच्या कचऱ्यात पडली होती. तिचा स्फोट होऊन तिघा मुलांना प्राण आणि एकाला पाय गमवावा लागला. अर्थात लष्कराने ही गोष्ट नाकारली व पुढे शासनाने त्याला ७५,००० रुपयांची मदत दिली. कष्टकरी कुटुंबातील एक लहानगा हरपला तर दुसरा कायमचा अपंग झाला. या घटनेचा विचार केला तर असे लक्षात येईल की इथे सशस्त्र संघर्ष कुठेच झाला नाही मात्र नुकसान झाले. म्हणून सशस्त्र सैनिकीकरणाचे इतर परिणामही आपल्याला विचारात घ्यावे लागतील. वीट कारखान्यांच्या बाजूला अर्धवट तुटलेल्या विटांचेच तुकडे सापडतात, वेल्डिंग काम करणाऱ्या व्यक्तींच्या आजूबाजूला लोखंडी तुकडे सापडतात. प्रचंड सैनिकीकरण झालेल्या भागात अन्नधान्याची टरफले तर सापडणार नाहीत ना!

आपणा सर्वांसाठी, ज्यांनी प्रत्यक्ष सशस्त्र संघर्ष किंवा युद्ध अनुभवलेले नाही, त्यांना, बंदुकीच्या गोळीचा आवाज 'ढिश्क्याँव...' असा येतो, असा काहीसा भ्रम असतो. आणि आपली लेकरे, मुले-बाळेपण हाताच्या बोटांची बंदूक करून असा आवाज काढतात आणि आपण त्यांच्याकडे कौतुकाने बघतो. त्या 'ढिश्क्याँव...' चा 'ठ्राप' असा खराखुरा आवाज आणि परिणाम इतका भयंकर असतो की असा आवाज जिथे नियमित येतो तिथे बालकांना कौतुकाची टाळी वाजवतानाही विचार करावा लागतो आहे.

आनंद पवार
anandpawar@gmail.com
9850516237

अवघड विषयांवरचा प्रांजळ संवाद

मुलांनी आपले ऐकावे असे सर्वच पालकांना व शिक्षकांना वाटते. पण मुलांशी बोलता येणे ही एक कला आहे आणि प्रत्येक पालकाने व शिक्षकाने ती शिकायला हवी. त्यासाठीची पूर्वतयारी म्हणजे मुले बोलत असताना काळजीपूर्वक ऐकून त्यांचे विचार व भावना समजून घेणे. आपल्या गरजा इतरांपर्यंत पोचविण्याइतपत भाषा मुले खूप लवकर आत्मसात करतात. तान्ही मुलेसुद्धा रडून आपली भुकेची किंवा ओले कपडे बदलण्याची गरज पालकांपर्यंत पोचवितात. परंतु आपल्या भावना किंवा विचार सुसंबद्धपणे मांडण्याच्या प्रक्रियेला मात्र बराच काळ जावा लागतो. मुलांना जेव्हा असुरक्षित वाटते किंवा भीती वाटते, तेव्हा आलेला ताण कमी करण्यासाठी मोठ्या माणसाला त्याबद्दल सांगणे गरजेचे असते. परंतु मोठे माणूस ते ऐकून घेईल, समजून घेईल, उडवून लावणार नाही याची मुलांना पक्की खात्री असेल तरच मुले आपले मन मोकळे करतात.

मुलांमध्ये ताण निर्माण करणारे अनुभव कोणते? हवी असलेली एखादी गोष्ट न मिळण्याइतका हा अनुभव साधा असू शकतो. परंतु असे काही अनुभव असतात की जे मुलांमध्ये कितीतरी अधिक प्रमाणात ताण निर्माण करतात. आजारपणात किंवा लसीकरणासाठी डॉक्टरांकडे जाणे, शाळेचा पहिला दिवस, घरी किंवा घराबाहेर होणारा शारीरिक अथवा मानसिक छळ, घरातील एखादे प्रदीर्घ किंवा गंभीर आजारपण, मृत्यू किंवा नव्या बाळाचे आगमन हे अनुभव मुलांमध्ये खूप जास्त ताण निर्माण करतात. युध्द, दहशदवाद, नैसर्गिक आपत्ती यासारख्या जागतिक पातळीवरील अनुभवांचाही मुलांच्या मनावर फार मोठा परिणाम होतो.

संगणक, इंटरनेट, टी.व्ही. यासारख्या माध्यमांमुळे बाहेरच्या जगाशी गेल्या पिढीपेक्षा या पिढीतील मुलांचा खूप जास्त संपर्क येतो. मुलांच्यातील नैसर्गिक कुतूहल आणि करून पाहण्याची, नवीन शिकण्याची इच्छा यामुळे आजूबाजूला घडणाऱ्या सर्व गोष्टींचा मुलांवर फार मोठा परिणाम होतो. अशा सर्व अनुभवांपासून बालकांचे संरक्षण करणे जवळ जवळ अशक्यच असते. मग अशा नकारात्मक अनुभवांचा मुलांना त्रास होऊ नये म्हणून आपण एक जबाबदार पालक या नात्याने काय करू शकतो? तर आपल्या आयुष्यातील नकारात्मक अनुभव समजून घेऊन त्यांच्याशी योग्य व सकारात्मक प्रकारे मुकाबला करायला मदत करू शकतो. उदाहरणादाखल आपण काही अवघड बाबी/समस्या व त्या त्या प्रसंगी मुलांशी कसे बोलता येईल ते पाहू.

नव्या बाळाच्या आगमनासारख्या महत्त्वाच्या घटनांपूर्वीच मुलांची मानसिक तयारी करा

लहान मुलांना ध्यानीमनी नसताना घडणाऱ्या आकस्मिक घटना आवडत नाहीत. गर्भारपणामुळे आईच्या रूपात व स्वभावात होणारे बदल, तिचे आजारपण व दवाखान्यात जाणे, नव्या बाळाचे आगमन या साऱ्यांचा मुलांवर बराच परिणाम होत असतो. दिवस गेल्यापासून ते बाळंतपणापर्यंत बाळाच्या आगमनासाठी करण्यात येणाऱ्या तयारीत थोरल्या मुलांचा सहभाग घ्यावा.

बाळ यायला आणखी किती महिने अवकाश आहे, बाळ कुठे झोपेल, तू काय काय मदत करायची आहे हे मुलाबरोबर बोलले जावे. तू थोरली ताई किंवा दादा होणार पण बाळ आल्यावर तुला बाळाबरोबर आई-बाबांचा वेळ वाटून घ्यावा लागेल हे त्यांना सांगितले जावे. आई-बाबांचा वेळ, झोपण्याची जागा, खेळणी वगैरे वाटून घेण्याची संकल्पना समजायला मुलांना अवघड जाते. त्यामुळे त्याविषयी पुन्हा पुन्हा सांगितले जावे. वाटून घेणे म्हणजे देऊन टाकणे नाही तर बाळाला बरोबर घेऊन खेळणे होय हे समजावून सांगावे. मुलांच्या मनाला लागलेला घोर समजून घ्यावा. तुला दुखतंय का? तू बाळ व्हायला दवाखान्यात गेलीस की मरशील का? तुझं माझ्यापेक्षा बाळावर जास्त प्रेम असेल का? मुलांच्या मूर्खासारख्या वाटणाऱ्या अशा प्रांजळ प्रश्नांना शांतपणे, गंभीरपणे आणि संवेदनशीलतेने उत्तरे द्यायला हवीत.

एकदा बाळ आल्यावर थोरल्या मुलासाठी वेगळा वेळ काढावा. त्याच्या जेवणाच्या वेळी त्याच्या जवळ बसावे किंवा त्याला झोपवताना त्याच्या जवळ असावे, गोष्ट सांगावी किंवा कधीतरी १०-१५ मिनिटे तरी त्याच्या एकटयासाठी वेळ द्यावा. मुलांना हा दिलासा देणे आवश्यक आहे. अन्यथा स्वतःकडे कायम घरातील सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या आपल्या धाकट्या भावंडाबद्दल त्यांना राग येऊ लागतो व तिरस्कार वाटू लागतो.

शाळेची सुरुवात

बालशाळेची सुरुवात ही मुलांच्या दृष्टीने त्यांनी समाजात टाकलेले पहिले पाऊल होय. शाळा सुरू होण्यापूर्वीच शाळेत जायचे म्हणजे नक्की काय हे त्यांना समजावून सांगण्याने त्यांच्या मनातील ताण व असुरक्षिततेची भावना कमी व्हायला मदत होते. उदाहरणार्थ ''घरी कशी आई तुझी काळजी घेते तशाच ताई शाळेत तुला मदत करतील. ताई सांगतील ते तू ऐकत जा आणि तुला काही हवे असल्यास त्यांना सांग. तुला खेळायला तिथे खूप खेळणी मिळतील आणि तू त्यांची काळजी घ्यायला शिकायचे. तुला खेळायला खूप नवी मित्र मंडळी मिळतील. तुला खूप नव्या गोष्टी शिकायला मिळतील आणि तू घरी आल्यावर मला त्या सगळ्या सांगायच्या. तुला जर काही आवडले नाही आणि काय करायचे ते कळले नाही तर ताईंना विचारायचे,'' अशा प्रकारे बोलून शाळेविषयी मुलांच्या मनात सकारात्मक प्रतिमा तयार करावी.

शाळेत किंवा समाजात मिळणारी अनुचित वर्तणूक

मुलांची उचित-अनुचित यांची समज चांगली विकसित व्हायला हवी आणि जशी ती त्यांच्या वैयक्तिक अनुभवातून होते, तशीच जाणीवपूर्वकही विकसित करायला हवी. उदाहरणार्थ दोन मुलांना एकच खेळणे हवे आहे. त्यासाठी एक मूल रडत आहे. मोठी माणसे

कित्येकदा फारसा विचार न करता रडे आणि आवाज थांबवण्यासाठी गप्प असणाऱ्या मुलाला ते खेळणे रडणाऱ्या मुलाला द्यायला सांगतात. यामुळे मुले दोन चुकीच्या गोष्टी शिकतात. पहिले म्हणजे आपल्याला हवे ते मिळवण्यासाठी आपण आरडाओरडा, किंचाळाकिंचाळी करायला काही हरकत नसते आणि दुसरी म्हणजे मोठी माणसे नेहमी योग्यच वागतात असे बिलकुल नसते.

मुलांना शक्यतो आपल्या समस्या आपणच सोडवायला प्रोत्साहन द्यावे. अगदीच गरज पडली तरच मोठ्या माणसांची मदत घ्यायची सवय लावावी. एकदा का मुलांना उचित काय आणि अनुचित काय याची पक्की समज आली की ती इतरांना त्यानुसार वागवतात आणि इतरांनी त्यांच्याशी तसे वागावे अशी अपेक्षा बाळगतात. उदा. गटात चर्चा करताना आपली पाळी येईपर्यंत थांबावे, साहित्य, खेळणी सर्वांबरोबर वाटून घ्यावी अशासारखी मूल्ये मुले अनुभवातूनच शिकतात.

कामात असलेल्या आईने आपल्याकडेच सारखे लक्ष दिले पाहिजे अशी अपेक्षा करणाऱ्या मुलीला तू मला नीट विचार. रडून किंचाळून काही होणार नाही. माझे काम झाले की मी तुला मदत करेन. आत्ता मला बाळाला जेवू घालायचे आहे. ते झाले की मी तुझ्याकडे येते. असे आईने ठामपणे आणि शांतपणे सांगायला हवे. आपल्याला गरज असताना आईने आपल्याकडे लक्ष द्यावे अशी रास्त अपेक्षा असणाऱ्या मुलीवर जर आई वसकन ओरडली किंवा एक धपाटा हाणला तर तिचा असा समज होतो की आपल्या हातात सत्ता असेल किंवा आपण मोठे असू तर आपण अयोग्य व अन्याय्य वागू शकतो. आयुष्यात पुढे याचा फारच वाईट परिणाम होतो. म्हणूनच मुलांबरोबर मोठ्यांचे वागणे हे सातत्याने न्याय्य हवे. आपण हे असे का वागलो याबद्दल मुलांशी स्पष्ट बोलले जावे व ते का उचित आहे हे निःसंदिग्धपणे सांगितले जावे.

घरातील आजारपण किंवा मृत्यू

आजारपण किंवा मृत्यू ही घटना दुःखद असल्याने त्यापासून मुलांचे संरक्षण करायचे म्हणून मोठी माणसे पुष्कळदा लहान मुलांशी त्याबद्दल काहीच बोलत नाहीत. याचे कारण कित्येक मोठ्यांची लहानांबद्दलची चुकीची धारणा. मोठ्यांना असे वाटते की आपण सांगितले तरच लहानांना समजते किंवा आपण सांगू तीच मुलांची समज होते. पण असे नसून प्रत्येक लहान मूल आपल्या अनुभवांचा अर्थ लावून आपली अशी एक समज निर्माण करण्यास सक्षम असते आणि तशी ती बनवतही असते. आपल्याला त्यांचे खरोखर संरक्षण करायचे असेल तर आपण त्यांच्या अर्थ लावण्याच्या प्रक्रियेला मदत करायला हवी. कशी, तर त्यांच्याशी स्पष्ट बोलून. आजारी माणसाच्या आजाराबद्दल मुलांशी बोलले जावे. ''डॉक्टर सर्व प्रयत्न करीत आहेत. पण तरीही आजी (किंवा आजोबा किंवा आजारी असणारी व्यक्ती) बरेच दिवस दवाखान्यातच राहणार आहे आणि कदाचित कधीच घरी येऊ शकणार नाही.'' मुलांच्या भावनांचा सच्चेपणा जाणून ''तू वाईट वाटून घेऊ नकोस. सर्व काही ठीक होणार आहे'', असे मोघम म्हणण्यापेक्षा मला माहीत आहे तुला वाईट वाटते आहे. ''मला पण वाईट वाटते आहे. पण आपण धीर धरायला हवा आणि आपले रडू आवरायला हवे,'' असे म्हणण्याने मुलांना अधिक आधार वाटतो. मुलांशी बोलताना त्यांना समजेल अशा भाषेत बोलायला हवे. खूप संयमाने बोलायला हवे आणि आपल्या स्वतःच्या भावना काबूत ठेवायला हव्यात.

कौटुंबिक हिंसा आणि लैंगिक शोषण

बहुसंख्य समाजांमध्ये या विषयांवर बोलणे टाळले जाते कारण हे विषय (taboo) वर्ज्य, लज्जास्पद, किळसवाणे समजले जातात. कधी कधी लहान मूल कौटुंबिक हिंसा किंवा लैंगिक शोषणाची प्रत्यक्ष शिकार झाले नसले तरी घरातील इतर मोठ्या व्यक्तीच्या बाबतीत घडणाऱ्या शारीरिक किंवा भावनिक हिंसेचा मुलांवर फार मोठा परिणाम होतो. त्यांना इतके समजते की जे काही घडते आहे ते योग्य नाही पण तरी ते का घडते आहे हे ती समजू शकत नाहीत. तसेच आपण त्याबद्दल काय करावे हे त्यांना समजत नाही. बरेचदा मुलांना वाटते की ही जी हिंसा घडते आहे त्याला आपणच कारणीभूत आहोत.

जेव्हा मुले स्वतः या हिंसेचे बळी असतात तेव्हा तर त्याचे कारण समजायला किंवा मदत मागायला त्यांना अधिकच अवघड जाते. या समस्यांना साधे सोपे उत्तर नाही. कुटुंबातील कोणावर तरी विश्वास टाकून आपल्याला त्रास होऊ लागला तर त्यांच्याशी बोला असे मुलांना स्पष्टपणे सांगावे; पटवून द्यावे. एखाद्या आवडत्या व्यक्तीने जवळ घेण्यासारखा चांगला स्पर्श आणि ज्यामुळे आपल्याला वेदना होतात किंवा अस्वस्थ वाटते असा वाईट स्पर्श यांबद्दल मुलांना सांगावे. सोप्या भाषेत स्पष्ट बोलल्याने किंवा बाहुलीचा वापर करून समजावून सांगितल्याने अगदी लहान मुलांनासुद्धा या गोष्टी चांगल्या समजतात.

घटस्फोट

आपल्यासारख्या पारंपरिक, जुन्या वळणाच्या समाजातही गेल्या १५-२० वर्षांत सर्व स्तरांमध्ये घटस्फोटाचे प्रमाण वाढलेले दिसते. कधी कधी एकमेकांना शह देण्यासाठी नवराबायको मुलांचा वापर करतात आणि मोठ्यांच्या भांडणात विनाकारण मुलांचा बळी जातो. अशा वेळी मुलांना हा दिलासा द्यावा लागतो की जे काही घडते आहे ती त्यांची चूक नाही. पुन्हा मुलाला या प्रकारात पूर्णपणे सुरक्षित ठेवता येणे अशक्य आहे. परंतु आई-वडील दोघांनीही मुलांशी बोलून त्यांना सावरायला मदत करायला हवी. मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी हे आवश्यक आहे.

जागतिक घडामोडी

आज तंत्रज्ञानाच्या विस्फोटामुळे व इंटरनेट आणि मोबाईल फोन यांच्या सहज उपलब्धतेमुळे जगात एका कोपऱ्यात घडणारी घटना क्षणातच जगाच्या काना-कोपऱ्यात पोहोचते. ही घटना भूकंप, त्सुनामी, किंवा वणव्यासारखी एखादी नैसर्गिक आपत्ती असो, अथवा दहशतवाद्यांचे हल्ले असोत, मुलांपर्यंत ते पोचणार आहेत आणि मुले आपल्या निसर्गसुलभ प्रेरणेने त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार आहेत. अशा वेळी अशा घटनांच्या लोकांच्या

(पान १५ वर)

आनंदाने शिकण्याच्या दिशेने

पालकनीती खेळघर हस्तपुस्तिकेचा प्रकाशन समारंभ नुकताच पार पडला, त्यानिमित्ताने...

प्रकाशन समारंभाबद्दल थोडे...

२२ नोव्हेंबरच्या रविवारी संध्याकाळी 'आनंदाने शिकण्याच्या दिशेने' या पालकनीती खेळघर हस्तपुस्तिकेचा प्रकाशन समारंभ उत्साहात पार पडला. हा एक आनंद सोहळा होता. पालकनीती खेळघराच्या मित्र-मैत्रिणींचा आनंद मेळावाच म्हणा ना! प्रकाशनाची कल्पना अभिनव होती. माधव सहस्रबुद्धेंनी तयार केलेली पुस्तकाची प्रतिकृती उघडल्यावर त्यातून गोलात हातात हात धरलेल्या ६ मुलांचे चित्र पॉप-अप झाले, हेच प्रकाशन! खेळघराच्या धर्तीवर महाराष्ट्रभरात सुरू झालेल्या नव्या खेळघरांच्या प्रतिनिधींनी हे प्रकाशन केले.

कार्यक्रमात सुरुवातीला शुभदा जोशी यांनी खेळघराची आणि पुस्तकाची पार्श्वभूमी मांडली, तर माधुरी यादवाडकर यांनी संगणकावरील स्लाईड्सच्या साहाय्याने पुस्तकाची रचना सादर केली. त्यानंतर संजीवनी कुलकर्णींनी अतिशय हृद्य मांडणी केली. वंचित मुलांसाठीच्या आश्रमशाळांमध्ये, वसतिगृहांमध्ये दिल्या जाणाऱ्या लाल पाण्यातल्या डाळीच्या दाण्यांसारखीच त्यांच्या साठीच्या शिक्षणाची परिस्थिती आहे हे त्यांचे म्हणणे चटका लावून गेले. वर्षा सहस्रबुद्धे यांनी हस्तपुस्तिकेच्या निर्मितीकाळातील गमतीजमती आणि त्यांच्या आणि खेळघराच्या नात्याबद्दल खुमासदार शैलीत सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विवेक मॉन्टेरो (गणित आणि विज्ञान या विषयांत मूलभूत आणि व्यापक काम असलेल्या नवनिर्मिती या संस्थेचे संस्थापक) यांना आमंत्रित केले होते. गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे विषमता दूर करणारे शिक्षण. समतेच्या दिशेने नेणारे. अशा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क वंचित मुलांना मिळावा म्हणून खेळघर काम करत आहे. सगळ्या मुलांना हा हक्क मिळायला हवा यासाठी अनेकांनी एकत्र येऊन एक चळवळ उभी राहायला हवी असे ते म्हणाले. त्यांच्या या अत्यंत प्रेरणादायी मांडणीचा सारांश पुढे देत आहोतच.

मुलांबरोबरच्या कामात गुणवत्ता = समानता (Quality = Equality) हे समीकरण कायम ध्यानात ठेवायला हवे, ही खूणगाठ मनात पक्की बांधून कार्यक्रमाची सांगता झाली.

'भारतीय राज्यघटना आणि शिक्षणाचा हक्क' या विषयावरील डॉ. विवेक मॉन्टेरो यांच्या मांडणीचा सारांश

आपल्या देशात प्रत्येकाला - मग ती किंवा तो कोणत्याही जाती-धर्म-वंशाचे असोत, गरीब वा श्रीमंत असोत - राज्यघटनेत समान मूलभूत हक्क आहेत. हे हक्क 'एक माणूस- एक मूल्य'(one man, one value) ह्या समानतेच्या बळकट तत्त्वावर आधारित आहेत. समानतेचे हे तत्त्व स्वीकारून १९५० साली प्रजासत्ताक भारताने सामाजिक समतेच्या दिशेने एक दमदार पाऊल टाकले. ही समानता केवळ मताच्या अधिकारापुरती सीमित न राहता जगण्याच्या सर्व व्यवहारांमध्ये, मुख्य म्हणजे सामाजिक न्यायाच्या कक्षेमध्ये लागू झाली.

भारतीय राज्यघटनेत समानहक्कांचा समावेश स्वातंत्र्याबरोबरच झाला, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट मानायला हवी. इतर विकसित देशांच्या तुलनेत भारत विकसनशील म्हणजे पुरेसा विकास न झालेला देश मानला जात होता आणि आजही तसाच आहे. या तुलनेत विकसित समजल्या गेलेल्या युरोपियन देशांमध्ये किंवा अमेरिकेसारख्या देशातही समान मताधिकार प्रत्यक्षात येण्यासाठी विसाव्या शतकाचा उत्तरार्ध उजाडला. फ्रान्सने १९४४ साली तर अमेरिकेने त्याहून उशिरा म्हणजे १९६५ साली सर्व वंशांच्या नागरिकांना समान मताधिकार दिला.

समान हक्क मिळण्यापूर्वीच्या भारतीय समाजात सामाजिक उतरंडीची पद्धत आणि सवय होती. धर्म-जाती-वर्णभेदाच्या,

पुरुषसत्तेच्या अतिशय कडव्या भिंतींमुळे खालच्या मानल्या गेलेल्या जाती-वर्गांना आणि स्त्रियांना अत्यंत हीन आणि अन्यायकारक वागणूक दिली जात असे, आणि आजही ही परिस्थिती पूर्णपणे बदललेली नाही. तरीही निदान घटनेमध्ये ह्या विषमतेवर मात करण्याची, प्रत्येकाला स्वत:चा विकास करण्याची संधी निर्माण करून दिली गेली हेही महत्त्वाचेच आहे.

ह्या संकल्पनेतून पाहता, जगण्याचा मूलभूत हक्क म्हणून प्रत्येकाला शिक्षणाचा हक्कही मिळणे आवश्यकच आहे, आणि तो या समानतेच्या हक्काचाच एक भाग आहे, अन्वयार्थ आहे.

ही जाणीव असलेल्या ज्योतिबा फुले, गोपाळ कृष्ण गोखले, सयाजीराव गायकवाड आणि शाहू महाराजांसारख्या समाजसुधारकांनी स्वातंत्र्यपूर्व काळातही सार्वत्रिक, मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची मागणी वेळोवेळी केलेली होती. शिक्षण ही सामाजिक आणि राजकीय बदल घडवणारी प्रक्रिया आहे हे ओळखून राज्यघटनेचा मसुदा तयार होत असतानाच शिक्षणाचा हक्क हा नागरिकांचा मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट करण्याबाबत डॉ. आंबेडकरांसह राज्यघटनाकारांनी सूचनाही केलेली होती. सार्वत्रिक शिक्षण हा मूलभूत हक्क झाला तर तो वंचितांना नव्या जाणिवा देऊन समर्थ करेल, तसेच समानतेच्या बांधणीसाठी बळ देईल, अशीच त्यांची भूमिका होती. मात्र त्यावेळी या शिफारसीला काहींनी विरोध केला आणि शिक्षणहक्क हे केवळ एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून त्यात समाविष्ट करण्यात आले.

यानंतर साठ वर्षांनी, २००९ साली शिक्षणहक्क कायद्याचा घटनेत समावेश (कलम २१) झाला आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हा ६ ते १४ वयोगटांमधील बालकांचा कायदेशीर हक्क झाला. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) २००५ ला शिक्षणहक्क कायद्यासाठीचा अभ्यासक्रम आराखडा म्हणून मान्यताही दिली गेली.

NCF २००५ मधील समानतेबाबतचा दृष्टिकोण हा 'संधीच्या समानते' पुरता मर्यादित नाही. तर त्यामध्ये 'निष्पत्तीच्या समानते'चा आग्रह स्पष्टपणे नमूद केलेला आहे. सर्वांना एकाच पद्धतीचे, एकाच दर्जाचे (उच्च दर्जा असला तरी) शिक्षण, किंवा मुलींना मुलांइतकीच शिक्षणाची संधी अशी समानता प्रत्येकाच्या शिकण्यासाठी पुरेशी पडत नाही. परिस्थितीतील विविधता, क्षमता, फरक आणि वाट्याला येणारी वंचना लक्षात घेऊन 'निष्पत्तीच्या' म्हणजे परिणामाच्या समानतेपर्यंत जाण्यासाठी आवश्यक असलेल्या लवचीकपणाने, जिथे कमी पडत असेल तिथे तसे अधिक देण्याची गरज NCF २००५ मध्ये आग्रहाने मांडलेली आहे.

इतकी सुस्पष्ट आणि मूलभूत संकल्पना देणाऱ्या आराखड्यानुसार जर गेल्या ६ वर्षांत शाळांमधून काम झाले असते तर देशातले शिक्षणाचे चित्र आता दिसतेय त्याहून कितीतरी अधिक आशादायी दिसले असते! शिक्षणहक्क कायद्याशी सुसंगत काम अनेक शाळांमधून झाले असते. प्रत्यक्षात आज सोयीस्कर अंतरावर शाळा उपलब्ध असण्यापासून ते खाजगी शाळांमध्ये २५% आरक्षणाच्या अंमलबजावणीपर्यंत अनेक ठिकाणी प्रश्नच आहेत. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, हे या देशातल्या प्रत्येक बालकाला देशाने दिलेले वचन पूर्ण होण्याच्या वाटेवर अजून खूप मोठा पल्ला आपल्याला गाठायचा आहे.

काही उपक्रमशील शाळा आहेत किंवा काही प्रयोगशील शिक्षकही आहेत, तिथे बालशिक्षणाचे उत्कृष्ट, दर्जेदार काम होते आहे. मात्र ह्यांचे प्रमाण आवश्यकतेच्या मानाने नगण्य म्हणावे इतके कमी आहे. त्यामुळे ही 'शैक्षणिक बेटे' असली तरी असंख्य मुली आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुले दर्जेदार शिक्षणापासून आजही वंचित आहेत. आत्मसन्मान आणि आत्मविश्वास मिळवून देणारे अर्थपूर्ण शैक्षणिक अनुभव त्यांना शाळेत मिळत नाहीत. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे आणि समानतेचे स्वप्न बघण्यासाठी सातत्यपूर्ण, अथक आणि साक्षेपी प्रयत्नांची आवश्यकता आहे. शासकीय शाळा व्यवस्था सुधारणे आणि पुन्हा घसरणीला लागणार नाही अशी दमदार करणे हाच तो मार्ग आहे.

प्रत्यक्षात, वेगळेच घडते आहे.

नव्या सरकारने नवीन शैक्षणिक धोरणाची प्रक्रिया सुरू केलेली आहे. ती चांगलीच गडबडीची म्हणजे स्पष्टच बोलायचे तर धोकादायक किंवा घातक अशी आहे. आजघडीला उपलब्ध असलेल्या अगदी प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भातील कच्च्या मसुद्यामध्ये तरी २००९ च्या शिक्षण हक्क कायद्याचा आणि NCF २००५ चा पुसटसा उल्लेखही केलेला नाही. जणू काही नव्याने अगदी पहिल्यांदाच हे शिक्षणधोरण आखले जात आहे, असा एकंदर आविर्भाव आहे. त्यावरून शिक्षणात नवउदारमतवाद (म्हणजे बेबंद भांडवलशाही) आणून धर्मनिरपेक्षता आणि समानतेसारख्या घटनेतील महत्त्वाच्या मूल्यांना मुरड घालण्याकडे वाटचाल आहे की काय, अशी साधार भीती शिक्षणकारणींना वाटू लागली आहे.

शिक्षणधोरण ठरवण्याच्या प्रक्रियेमध्येही अनेक धोकादायक शक्यता आहेत. वेबसाईटवरती जनतेला आपल्या सूचना (त्यासुद्धा अत्यंत मर्यादित शब्दसंख्येमध्ये) नोंदवता येतात. त्यांच्या प्रमाणावरून अशी वरवर, 'सर्वांना सहभागी करून घेणारी निर्णयप्रक्रिया होईल' असे भासवले जात आहे. खरे म्हणजे अशा 'भासमान लोकशाही' पद्धतीनं शिक्षणधोरणासारखे निर्णय होऊच शकत नाहीत. त्यासाठी शिक्षणात काम करणारे लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणकारणी यांचे सखोल मार्गदर्शन लागेल आणि तेही NCF २००५ च्या तगड्या आराखड्याच्या आधाराने! हे घडून यायला हवे असेल तर फक्त वाट बघत बसणे बरोबर नाही. शिक्षक, शिक्षणकर्मी आणि पालक यांनी मिळून सरकारदरबारी आग्रह धरायला हवा आहे. वेळ पडल्यास त्यासाठी राजकीय पातळीवरचा लढा द्यायची तयारीसुद्धा ठेवावी लागेल.

खेळघर कशासाठी ?

घटनेने सर्व नागरिकांना समान मूल्य दिले, समान दर्जा दिला, तरी वास्तवातले चित्र मात्र प्रचंड विषमतेने भरून राहिलेले आपल्याला दिसते. या विषमतेची सर्वात अधिक झळ पोहोचते ती वंचित कुटुंबांमधील बालकांना! गरिबी, रूढी-परंपरा-अंधश्रद्धांचा पगडा, शिक्षणाचा अभाव, पालकांची व्यसनाधीनता आणि समाजाकडून मिळणारे नाकारलेपण या अडथळ्यांमुळे मुलांचे - विशेषतः मुलींचे शिक्षण मागे पडते.

तऱ्हेतऱ्हेच्या वंचिततांनी वेढली गेलेली ही मुले मग शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून तुटली जातात, शाळा आणि त्यांचे जगणे यात एवढे अंतर असते की ती शाळेत जात नाहीत, गेली तरी रमू शकत नाहीत, शिकणे तर दूरच राहते.

रोजच्या जगण्याच्या प्रश्नात अडकलेले त्यांचे अशिक्षित किंवा अल्पशिक्षित पालकही परिस्थितीपुढे असहाय्य असतात आणि मुलांना पुरेसे आशादायक वाढ-विकासाचे, शिक्षणाचे वातावरण मिळत नाही. या परिस्थितीला आपल्या मर्यादित का होईना पण तळमळीच्या प्रयत्नांचा आधार देण्याच्या कल्पनेतून 'खेळघर' ही संकल्पना पालकनीतीने प्रत्यक्षात आणली आहे.

खेळघराचे काम म्हणजे वंचितांच्या प्रती असलेल्या तळमळीतूनच केवळ स्वीकारलेले भावनिक आव्हान नाही, तर आपल्या सभोवतालच्या जगातली वंचितता दूर करण्यासाठी प्रत्येकाला 'समान हक्क मिळण्यासाठी' केलेले प्रयत्न आहेत. परिस्थितीने मुलांच्या वाट्याला आलेल्या वंचितता भरून काढून त्यांना शिक्षणाच्या वाटेवर सशक्तपणे येता यावे यासाठी लागणारी मदत करण्याची सामाजिक पालकत्वाची भूमिका त्यामागे आहे.

मुलांना शिकण्यातला आनंद समजावा, शिकावेसे वाटावे, संवेदनशील विचार करता यावा, उत्तरांचा शोध घेता यावा, मिळालेली नवी माहिती अनुभवांशी ताडून पाहता यावी, इतकेच नाही तर जे समजले आहे ते मोकळेपणाने व्यक्तही करता यावे,

असा हा कामाचा घाट खेळघराने घातलेला आहे.

खेळघराची सुरवात पुण्यातील लक्ष्मीनगर या झोपडवस्तीतील मुलांसाठी झाली असली तरी या वस्तीपुरती ती मर्यादित नाही. तिचा विस्तार व्हावा, यासाठी गेली नऊ वर्षे प्रशिक्षण-कार्यशाळा घेतल्या जात आहेत. या कार्यशाळांमध्ये सहभागींना शिकण्यातल्या आनंदाची प्रत्यक्ष अनुभूती मिळावी, स्वतःच्या दृष्टिकोनांना तपासून बघत मनामध्ये या प्रक्रियेचा अर्थ प्रतिबिंबित व्हावा, अशी योजना असते.

गेल्या ६ वर्षांत पालकनीती खेळघराच्या मदतीने राज्यभरात विविध ठिकाणी जवळजवळ २० नवीन खेळघरे सुरू आहेत. ही खेळघरे म्हणजे शहरी झोपडवस्त्या, खेडी, आदिवासी पाडे अशा अनेक ठिकाणी, मुलांबरोबर मायेने शिकण्या-शिकवण्याचे प्रयत्न करणारी पालक-केंद्रे आहेत.

खेळघर ही शाळा नाही, किंवा संस्कारवर्ग किंवा व्यक्तिमत्व विकास शिबिरेही नाहीत. खेळघरातली खेळ-कला-संवादावर आधारित शिक्षणपद्धती मुलांच्या नैसर्गिक क्षमतांचा विकास घडवून आणेल आणि वाट्याला आलेल्या विषम परिस्थितीवर मात करून उपलब्ध शालेय वास्तवाशी सक्षमपणे जोडून घेऊन खऱ्या अर्थाने सुशिक्षित होण्यासाठी आधाराचा हात देईल असा विश्वास वाटतो.

अवघड विषयांवरचा प्रांजळ संवाद

(पान १२ वरून)

आयुष्यांवर होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देऊन आपण मुलांना मदत करू शकतो. अशा प्रामाणिक आणि स्वच्छ चर्चेमुळे इतरांच्या जागी आपण स्वतः असतो तर... अशी कल्पना करणे सोपे जाते. त्यामुळे मुलांच्या मनात जगभरातील लोकांविषयी आत्मीयता निर्माण होते.

मुलांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग असणाऱ्या अवघड बाबी, समस्या व घडामोडींबद्दल मुलांशी प्रांजळ बोलणे त्यांच्या सामाजिक व भावनिक आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. अशा अवघड घटनांना सामोरे जाण्यासाठी उपयुक्त ठरतील अशी कौशल्ये मुलांमध्ये निर्माण करण्यासाठी मुलांच्या आयुष्यातील मोठ्यांनी कटिबद्ध रहायला हवे. कोणती आहेत अशी कौशल्ये? इतरांना न्याय्य वागणूक देणे आणि त्यांच्याकडूनही तशीच अपेक्षा करणे, आपल्या कृतीची जबाबदारी घेणे, इतरांची भूमिका समजावून घेणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इतरांशी संवाद साधायला शिकणे. मोठ्या लोकांनी लहानांच्या गरजा समजून घ्यायला आणि त्यांना संवेदनशीलतेने प्रतिसाद द्यायला शिकले पाहिजे. एकूणच घरी, शाळेत आणि एकंदर समाजात विश्वासाचे सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही मोठ्यांची जबाबदारी आहे. असे वातावरण की जिथे मुलांना मनातले बोलायची भीती वाटणार नाही आणि त्यांचे ऐकून घ्यायला मोठ्यांना उसंत असेल.

डॉ. नीलिमा गोखले
neelima.gokhale@gmail.com
9823053272

डॉ. मंजिरी निंबकर
manjunimbkar@gmail.com
9822040586

Published & Posted on 16 December 2015
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month

RNI No. MAH MAR 2001/4166
Registered No. PCW/ 026/ 2015-2017

नसलेली शहाणी वेबपाने

आजचे जगणे ऑनलाईन झालेय कारण क्लाउडसोर्सिंगच्या जगात एका क्लिकवर हवे ते हव्या त्या ठिकाणी मिळू लागलेय असाच प्रत्येकाचा समज आणि विश्वास होऊन बसलाय. कोणतीही गोष्ट एका क्लिक किंवा एका कॉलवर उपलब्ध होत आहे. सर्व काही एकदम पटकन. अगदी चुटकीसरशी. मग एका क्लिकने घरातले सर्व फर्निचर खरेदी करावे किंवा मग रेस्टॉरंटमधून आवडता मेनू ऑर्डर करावा. हीच ऑनलाईन लाईफची मज्जा समजली जात आहे. या दुनियेत ज्ञान-संपादन हे देखील वनक्लिकवर मिळावे ही अपेक्षा होऊन बसली आणि याकडे सर्वांचा कल वाढू लागला. पूरक ज्ञान मिळवणे आणि ते स्वतः पारखून घेणे ही जबाबदारी कोणाच्या लक्षातच येत नाही अशी जाणीव आज होत आहे. 'ऑनलाईन जे जे उपलब्ध आहे ते ते बरोबर' हे चुकीचे सूत्र आज अनेकांच्या डोक्यात पक्के बसले आहे. त्यातच सोशल नेटवर्किंग महाजाल पसरलेले. अगदी चौथी-पाचवीच्या मुलांपासून ते मोलमजुरी करणाऱ्या वर्गापर्यंत हे महाजाल पोहचले आहे. बहुचर्चित ऑर्कुटसारख्या सोशल नेटवर्किंग साईटमुळे तर देशातील नेटकॅफे व्यवसायिकांना खरोखरच अच्छे दिन आले. या वेबपानांची दुनिया आणि तिचे अंतरंग किती आणि कसे वापरावे हे पाहाणे आज गरजेचे ठरत आहे. त्यातच शहाण्या नसलेल्या वेबपानांचा समाचार घेणेदेखील आवश्यक आहे.

मुलांच्या विश्वातील पुस्तकांची जागा मोबाईल आणि कॉम्प्युटर गेम्सनी घेतली. एकंदर मुलांची मनोरंजनाची संकल्पना आणि साधनं दोन्ही बदलली गेली आणि बहुतांश मुलांच्या आयुष्यात पुस्तकांची पानगळ होऊ लागली. अर्थातच या महाजालाने यावरही तोडगा काढला आणि ई-बुक ही संकल्पना समोर आली. मात्र इथेही शेवटी काय निवडायचे हा प्रश्न आलाच. छोटा भीम आणि काही कार्टून यांची पुस्तकेदेखील अनेक वेबपानांतून मुलांच्या आयुष्यात आली. आज अनेक वेबपाने आणि ई-बुक्स टी.व्ही. वरील कार्टूनच्या गोष्टी मुलांना सांगू लागलीत. मुले चांगल्या पुस्तकांच्या, मग त्या ई-बुक्सच्या माध्यमातील का असेनात सहवासातून पुन्हा दूर जाऊ लागलीत. पुस्तकांशी मैत्री होण्याच्या वयात डोरेमॉन, पोकेमॉन, ऑसवल्ड, छोटा भीम हेच त्यांचे ई-सवंगडी बनत आहेत. म्हणूनच ई-बुक्स सारख्या माध्यमातून मुलांना आणि एकंदर सर्वांनाच काय शहाणपण दिले जातेय हे तपासण्याची आता वेळ आलेली आहे.

स्पर्धा, परीक्षा आणि नवीन भाषा शिकणे ही आजच्या समाजाची गरज जाणून अनेक वेबपाने तयार होत आहेत. यात विविध खेळांच्या माध्यमांतून परीक्षा अथवा भाषा शिकवण्याचा अट्टहास दिसतो. यातले काही बुध्दीला चालना देणारे असले तरी ते विचारांचे पोषण करणारे नाहीत हेही तितकेच खरे. खरे तर आपण तंत्रज्ञानाच्या मर्यादा आणि आपल्या गरजा यांचा पुरेसा विचार करीत नाही. एखादा ऑनलाइन ई-गुरू आपल्या मुलांना काय शिकवतोय किंवा काय परीक्षा घेतोय याचा विचार करणे गरजेचे आहे.

या इंटरनेटच्या महाजालात विशेषतः मुलांच्या संदर्भात पालक आणि शाळा एखाद्या ग्रंथपालासारखी भूमिका बजावू लागले तरच तंत्रज्ञानातून आपल्यासाठी आणि आपल्या मुलांसाठी काय घ्यायचे हे समजेल. इथे उल्लेख करावीत अशी काही शहाणी नसलेली वेबपाने जी मुलांच्या एकूण मानसिकतेवर परिणाम करणारी ठरत आहेत असे सर्वेक्षण सांगते, ती म्हणजे सर्वश्रुत असे Facebook, Kik messenger, Snapchat आहेतच पण आपण कधीही न ऐकलेली मात्र मुलांपर्यंत पोहोचलेली पण काही आहेत. Ask.fm या संकेतस्थळावर मुले आपले प्रश्न विचारू शकतात आणि इतर अनोळखी लोक त्याला उत्तरे देत असतात. इथे उत्तर कोण देत आहे किंवा त्याला त्या प्रश्नाबाबत किती समज आहे हे माहीत नसते त्यामुळे मुलांच्या मानसिकतेवर वेगळा परिणाम होताना दिसत आहे. Instagram सारख्या साईटचा/app चा वापर करून फोटोमिक्सिंग सारख्या गोष्टी केल्या जातात, ज्यामध्ये मुले जास्त पटाईत होताना दिसत आहेत आणि ज्यातून काही गुन्हे समोर येत आहेत.

स्मार्ट फोन जसा घरात पोहोचला तसेच खास मुलांसाठी खेळणी असणारी वेबपानेदेखील त्यावर झळकू लागली. विविध प्रकारच्या खेळण्यातल्या बंदुका, रक्ताळलेली दिसणारी सॉफ्ट टॉय्ज, प्रचंड हिंसा असणारे व्हिडिओ गेम्स यांच्या ऑनलाईन दुकानांची मांदियाळी तर थक्क करणारी आहे. रोमांचकतेचे भयानक चित्र असणाऱ्या या खेळण्यांमुळे मुले खेळतानाही बॉम्ब, गोळ्या, बंदुका असे शब्द उच्चारताना आणि तसेच युद्धाचे नाट्यीकरणदेखील करताना दिसतात. समोरच्याला मारणे यात जणू काही त्यांना आनंद वाटत असतो.

मुलांची अभिरुची, मानसिकता, आवडनिवड जाणून तशी वेबपाने त्यांना सुचवणे, त्याविषयी अधिक माहिती देणे हे सर्व घडायला हवे. ज्ञान, विवेक, समज, विरंगुळा, जिज्ञासापूर्ती या कितीतरी गोष्टी आपल्याला आजचे तंत्रज्ञान मिळवून देत आहे. इंटरनेटसारखी साधने माहिती पुरवू शकतात हे निश्चित मात्र अभ्यास, तंत्रज्ञान, जीवनशैलीचा वाढलेला वेग, स्पर्धा या सगळयात डोळे झाकून सर्व वेबपाने प्रमाण मानणे धोक्याचे आहे, कारण या महाजालात जशी शहाणी वेबपाने आहेत तशीच शहाणी नसलेली वेबपानेदेखील खूप मोठ्या प्रमाणात आहेत.

प्रकाश अनभूले
anbhuleprakash@gmail.com
9960460474